www.rajdand.com
सातारा मंगळवार
५. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999
मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

### मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित न राहिल्यास ५० रुपये दंड

**जळगाव :** मुक्ताईनगरमध्ये आज मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्या हस्ते तापी नदीवरील पुलाच्या शुभारंभाचा कार्यक्रम पाडला. मात्र या कार्यक्रमाला महिला बचत गटातील महिला उपस्थित राहिल्या नसल्यास त्यांना ५० रुपयांचा दंड भरण्याची सक्ती करण्यात आली. याबाबतचा बचत गटाच्या अध्यक्षा आणि कार्यकर्त्या ज्योत्स्ना महाजन यांनी फोनवरून महिला बचत गटाच्या महिलांना मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला येण्यासाठी धमकावल्याचा आरोपराष्ट्रवादी काँग्रेसपार्टी - शरदचंद्र पवार पक्षाने केला आहे. महिला प्रदेशाध्यक्ष ड.रोहिणी खडसेयांनी ज्योत्स्ना महाजन आणि दुसऱ्या महिलेचे कॉल रेकॉर्डिंग ट्विट करत मुख्यमंत्र्यांकडे कारवाईची मागणी केली आहे. त्यामुळे आता मुक्ताईनगरबरोबरच जळगाव जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघाले आहे.

काय म्हटले आहे पोस्टमध्ये ?राष्ट्रवादी काँग्रेसपार्टी - शरदचंद्र पवार पक्षाने ट्वीट करत म्हटले की, आज मुक्ताईनगर तालुक्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेएका कार्यक्रमानिमित्त भूमिपूजनासाठी येत आहेत. महिला बचत गटाच्या महिला भगिनींनी माझ्याशी संपर्क साधून मला असे सांगितले की, 'मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला येण्यासाठी आमच्यावर दबाव आणला जात आहे. आम्ही जर उपस्थित नाही राहिलो तर, आमच्याकडून ५० रुपये दंड आकारले जातील, बचत गटातून काढून टाकण्यात येईल आणि कारवाई केली जाईल. असे बचत गटाच्या अध्यक्षा तसेच आमदारांच्या कार्यकर्त्या ज्योत्स्ना महाजन यांनी सांगितले आहे.महिला बचत गटाच्या भगिनींनी मला काही स्क्रीन शॉट आणि रेकॉर्डिंग ऐकवलेल्या आहेत. महिला भगिनींना दमदाटी करण्याचा ज्या ज्योत्स्ना महाजन प्रयत्न करत आहेत, त्यांना मी फोन करून शहानिशा केली. त्यावर त्यांनी त्याची कबुली देखील दिलेली आहे. आमची सरकारला एकच विनंती आहे की, 'या महिला बचत गटात ज्या भगिनी काम करतात त्यांची परिस्थिती बिकट आहे. आज त्यांना हाताला काम पाहिजे. आज कोणाची मुले, सासू-सासरे आजारी असू शकतात. कोणाला शेतात जायचे असेल. दिवसाचा रोज पाडून त्यांना जर कार्यक्रमाला जाणे शक्य नसेल तर त्यांच्यावर जबरदस्ती कशासाठी केली जात आहे ?'मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, 'आपल्या कार्यक्रमाला ज्यांना मनाने यायचे आहे.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल

## राजकीय घडामोडींना वेग

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रीअमित शाह हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यामुळेभाजपाकडूनअमित शाहयांच्या दौऱ्याची जोरदार तयारी करण्यात आली आहे. दरम्यान, आज रात्री अमित शाह हे छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झाले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झाल्यानंतर अमित शाह यांचे स्वागत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रीय मंत्री भागवत कराड, रावसाहेब दानवे यांनी केले. यावेळी राज्यमंत्री अतुल सावेही उपस्थित होते.-उ्तएठढखडएचएछ्ढ-वी लूआज रात्री अमित शाह छत्रपती छत्रपती संभाजीनगरमध्येच मुक्कामी असणार आहेत. उद्या सकाळी अमित शाह अकोला आणि जळगावमधल्या सभेला जाणार आहेत. उद्या सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून अकोला शहराकडे ते रवाना होतील. तेथून पुन्हा सायंकाळी ५ वाजता छत्रपती संभाजीनगर शहरात येतील. सव्वासहा वाजता क्रांतीचौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास अभिवादन केल्यानंतर मराठवाडा सांस्कृतिक मैदानावर एका सभेला उपस्थित राहणार आहेत.

सभा संपल्यानंतर रात्री आठ वाजेच्या सुमारास अमित शाह दिल्लीला रवाना होतील. दरम्यान, अमित शाह यांच्या दौऱ्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहर पोलिसांनी मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

सभेसाठी होणाऱ्या संभाव्य गर्दीमुळं शहरातील वाहतुकीमध्ये उद्या दुपारपासून रात्री १२ वाजेपर्यंत बदल करण्यात आला आहे. तसेच शहरात पोलिस आयुक्तांनी नो ड्रोन झोन प्रतिबंधक आदेशही लागू केले आहेत. दुसरीकडे, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

अमित शाह यांच्या यामहाराष्ट्रदौऱ्यात आगामी लोकसभा निवडणुकीसाठीभाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागावाटपाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होणार का? याकडेही अनेकांचे लक्ष लागले आहे.



# बाहेरील जिल्ह्यांत बदली झालेल्या २९ पोलीस निरीक्षकांची नागपुरात 'वापसी'

'**नागपूर:** मार्च महिन्यात कधीही लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जानेवारी महिन्यात राज्य पोलिस दलात मोठे फेरबदल करण्यात आले होते व नागपुरातील ४७ पोलिस निरीक्षकांची बदली करण्यात आली होती. मात्र बदलीच्या वेळी पोलीस ठाण्यात कार्यरत नसलेल्या पोलीस निरीक्षकांची बदली अभिप्रेत नसल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले होते. त्यानंतर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शहरातील २९ पोलीस निरीक्षकांची बदली रद्द करण्यात आली आहे.

आदेशानुसार हे पोलीस निरीक्षक शहरात परतणार असून येथे आलेले १८ जण जुन्या जिल्ह्यात परतणार आहेत. ३०



जून २०२४ पर्यंत तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या निरीक्षकांचा ३१ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आलेल्या यादीत समावेश होता.

लोकसभा निवडणुका मुक्त व स्वच्छ वातावरणात पार पडाव्यात यासाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना व निर्देशांनुसार या बदल्या करण्यात आल्या होत्या. मात्र राज्यातील काही पोलीस अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणात धाव घेतली होती.न्यायाधीकरणाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बदल्यांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार नागपुरातील २९ पोलीस निरीक्षक हे २१ डिसेंबर २०२३ रोजी पोलीस ठाण्यात कार्यरत नसल्याने त्यांची बदली अभिप्रेत नसल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले. राज्यातील एकूण ६५ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.हे पोलीस निरीक्षक नागपुरात परतणार

भानुप्रताप मडावी, अशोक कोळी, मनीष बन्सोड, मनोहर कोटनाके, वैजयंती मांडवधरे, विश्वनाथ चव्हाण, विनोद चौधरी, राजेश पुकाळे, मुकुंद साळुंके, अरविंद भोळे, हरिदास मडावी, बापू ढेरे, जग्वेंद्रसिंह राजपूत, दीपक गोसावी, हनमंत उर्लगोंडावार, नंदा मंगाते, अनिरुद्ध पुरी, अमित डोळस, संजय जाधव, संग्राम शेवाळे, अमोल देशमुख, राजेंद्रकुमार सानप, शुभांगी देशमुख, कविता इसारकर, बबन येडगे, रवींद्र पवार, रवींद्र नाईकवाड,रवी नागोसे, भारत कऱ्हाडे.


**हे पोलीस निरीक्षक जाणार**

**मनीष ठाकरे, राहुल आठवले, आसाराम चोरमाळे, शैलेश गायकवाड, दीपाली धडगे, प्रसाद गोकुळे, राजश्री आडे, अशोक भंडारे, सुनील पिंजन, विश्वजित खुळे, बाळकृष्ण सावंत, अरविंद पवार, राजू चव्हाण, सचिन गावडे, ज्ञानेश्वर आव्हाड, गीताराम शेवाळे, विकास धस, अरुण गरड.**

# माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ?

## अजित पवार-पाटील एकत्र प्रवास

**पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शिरुरचे शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील सोमवारी एकत्र प्रवास केल्याने आढळराव पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. शिरूरमधून आढळराव पाटील यांना उमेदवारी मिळणार की जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, भाजपचे नेते प्रदीप कंद हे उमेदवार असणार याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.



गेल्या लोकसभा निवडणुकीत आढळराव यांचा विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पराभव केला होता. शिवसेनेतील फुटीनंतर आढळराव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला.

त्यामुळे आढळराव पाटील आणि कोल्हे यांच्या लढत होईल, अशी चर्चा असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर राजकीय समीकरणे बदलली.

अजित पवार यांनीही शिरूर लोकसभेची जागा निवडून आणण्याचा चंग बांधल्याने त्यांचा उमेदवार कोण असेल, अशी चर्चा सुरू झाली असतानाच आढळराव यांना म्हाडाचे अध्यक्षपद देण्यात आले. महायुतीच्या उमेदवाराला मताधिक्याने निवडून आणले जाईल, असे आढळराव यांनी सांगितले होते.

मात्र त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्यांच्या प्रवेशाची चर्चा काही दिवसांपासून सुरू झाली होती. या चर्चेला त्यांनी अजित पवार यांच्यासमवेत मोटारीतून केलेल्या प्रवासामुळे अधिक जोर मिळाला आहे.

आंबेगाव तालुक्यातील विविध विकासकामांचे उद्घाटन सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आढळराव हे पवार यांच्या स्वागतासाठी हजर होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने या दोघांनी मोटारीने एकत्रित प्रवास केला. त्यामुळे राजकीय चर्चा सुरू झाली असून आढळराव यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रवेश निश्चित असल्याचे बोलले जात आहे.

### मनोज जरांगेंचा राज्य सरकारला इशारा

**अर्धापूर :** मोठ्या संख्येने मराठे एकत्रित आले आहेत. सगेसोयऱ्याची अंमलबजावणी केल्याशिवाय मागे हटणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव येथे सोमवार ४ मार्च रोजी रात्री १०.३० वाजता सकल मराठा समाजातर्फे आयोजित सभेत ते बोलत होते.

मराठा आरक्षणासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पुन्हा एकदा महाराष्ट्राचा दौरा करीत आहेत. दरम्यान, ते नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर सोमवार ४ मार्च रोजी विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालयात लग्न सोहळ्यासाठी आले होते. त्यानंतर रात्री १०.३० वाजता पिंपळगाव महादेव येथे त्यांची सभा झाली. पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले, मराठ्यांचा संघर्ष मोठा आहे. आमच्या जिवापेक्षा आम्हाला समाज मोठा आहे. आरक्षण मिळणार असून सरकारकडून सगेसोयऱ्याची अंमलबजावणी केल्याशिवाय मागे हटणार नाही. गेल्या सहा महिन्यांपासून लढा सुरू आहे, करोडो मराठ्यांनी पाठिंबा दिला आहे. आरक्षण मिळाल्यानंतर पहिली सभा पिंपळगाव येथेच होईल, असेही यावेळी बोलताना त्यांनी उपस्थित समाज बांधवांना आश्वासन दिले.

# बाहेरील जिल्ह्यांत बदली झालेल्या २९ पोलीस निरीक्षकांची नागपुरात 'वापसी'

'**नागपूर :** मार्च महिन्यात कधीही लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जानेवारी महिन्यात राज्य पोलिस दलात मोठे फेरबदल करण्यात आले होते व नागपुरातील ४७ पोलिस निरीक्षकांची बदली करण्यात आली होती. मात्र बदलीच्या वेळी पोलीस ठाण्यात कार्यरत नसलेल्या पोलीस निरीक्षकांची बदली अभिप्रेत नसल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले होते. त्यानंतर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शहरातील २९ पोलीस निरीक्षकांची बदली रद्द करण्यात आली आहे.-उ्तएठढखडएचएछ्ढया आदेशानुसार हे पोलीस निरीक्षक शहरात परतणार असून येथे आलेले १८ जण जुन्या जिल्ह्यात परतणार आहेत. ३० जून २०२४ पर्यंत तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या निरीक्षकांचा ३१ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आलेल्या यादीत समावेश होता.लोकसभा निवडणुका मुक्त व स्वच्छ वातावरणात पार पडाव्यात यासाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना व निर्देशांनुसार या बदल्या करण्यात आल्या होत्या. मात्र राज्यातील काही पोलीस अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणात धाव घेतली होती.न्यायाधीकरणाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बदल्यांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार नागपुरातील २९ पोलीस निरीक्षक हे २१ डिसेंबर २०२३ रोजी पोलीस ठाण्यात कार्यरत नसल्याने त्यांची बदली अभिप्रेत नसल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले. राज्यातील एकूण ६५ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.हे पोलीस निरीक्षक नागपुरात परतणार

भानुप्रताप मडावी, अशोक कोळी, मनीष बन्सोड, मनोहर कोटनाके, वैजयंती मांडवधरे, विश्वनाथ चव्हाण, विनोद चौधरी, राजेश पुकाळे, मुकुंद साळुंके, अरविंद भोळे, हरिदास मडावी, बापू ढेरे, जग्वेंद्रसिंह राजपूत, दीपक गोसावी, हनमंत उर्लगोंडावार, नंदा मंगाते, अनिरुद्ध पुरी, भारत कऱ्हाडे.

**हे पोलीस निरीक्षक जाणार**

मनीष ठाकरे, राहुल आठवले, आसाराम चोरमाळे, शैलेश गायकवाड, दीपाली धडगे, प्रसाद गोकुळे, राजश्री आडे, अशोक भंडारे, सुनील पिंजन, विश्वजित खुळे, बाळकृष्ण सावंत, अरविंद पवार, राजू चव्हाण, सचिन गावडे, ज्ञानेश्वर आव्हाड, गीताराम शेवाळे, विकास धस, अरुण गरड.

# केंद्र सरकारमधील १० लाख पदे भरणार

## राहुल गांधी यांचे तरुणांना आश्वासन

**नवी दिल्ली :** इंडिया आघाडी युवकांसाठी नोकऱ्यांचे बंद दरवाजे उघडेल, असेकाँग्रेसचेनेतेराहुल गांधीयांनी सोमवारी येथे म्हटले. भाजपने सातत्याने कंत्राटी पद्धतीला चालना दिल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.-उ्तएठढखडएचएछ्ढ१५ प्रमुख विभागांमध्ये ३० टक्क्यांहून अधिक पदे का रिक्त आहेत, याचे उत्तर केंद्र सरकारकडे आहे का? कायमस्वरूपी नोकऱ्या देणे हे ओझे समजणारे केंद्र सरकार सातत्याने कंत्राटी पद्धतीला प्रोत्साहन देत आहे, जिथे ना सुरक्षा आहे, ना



सन्मान. या रिक्त पदांवर देशातील तरुणांचा हक्क आहे आणि ही पदे भरण्यासाठी आम्ही एक ठोस योजना तयार केली आहे. तरुणांसाठी नोकऱ्यांचे बंद दरवाजे उघडण्याचा इंडिया आघाडीचा संकल्प आहे, असेही ते म्हणाले.सरकार शेतकऱ्यांना शत्रूसारखे वागवत आहे : खरगे

केंद्र सरकार त्यांच्या हक्कांची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांशी 'शत्रूसारखे वागत' आहे, असा आरोपकाँग्रेसचेअध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी केला. एमएसपी देण्याची सरकारची 'हमी' खोटी ठरली आहे, असा दावाही त्यांनी केला.बेरोजगारी आणि महागाई हे मुख्य मुद्दे सोडून माध्यमांनी चीन, पाक, क्रिकेट, बॉलिवूडकडे लोकांचे लक्ष वळविले आहे.

-राहुल गांधी, काँग्रेस नेतेकेंद्रात रिक्त पदे -

७८ विभागांत ९ लाख ६४ हजार पदे रिक्त

रेल्वे - २.९३ लाख

गृह मंत्रालय - १.४३ लाख

संरक्षण मंत्रालय - २.६४ लाख- ४४.४९%बेरोजगार २० ते २४ वर्षे वयातील तरुण

- ४५ वर्षांतील हा सर्वाधिक बेरोजगारीचा दर

- ३ पैकी एक पदवीधर बेरोजगार

- २ बेरोजगारांची प्रत्येक तासाला आत्महत्या.

- १५,७८३ बेरोजगारांनी आत्महत्या केली.

# लष्करी साहित्यांची आयात; देशासाठी घातक ठरू शकते

## स्वदेशी उत्पादनासाठी सरकार आग्रही - राजनाथ सिंह

**नवी दिल्ली :** शस्त्रे, लष्करी उपकरणांची स्वदेशात अधिकाधिक निर्मिती झाली तरच आपण सामरिक क्षमता नीट टिकवून ठेवू शकतो. त्या दिशेने आम्ही प्रयत्न केले व त्याचे सकारात्मक परिणामही दिसून आले. लष्करी साहित्यांची आयात; देशासाठी घातक ठरू शकते; स्वदेशी उत्पादनासाठी सरकार आग्रही - राजनाथ सिंहनवी दिल्ली : भारतासारख्या देशाने लष्करी उपकरणांच्या आयातीवर अवलंबून राहणे हे त्याच्या सामरिक क्षमतेसाठी घातक ठरू शकते, असे संरक्षणमंत्रीराजनाथ सिंहयांनी म्हटले आहे.

संरक्षण सामुग्रीचे स्वदेशात उत्पादन व्हावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार आग्रही आहे, असेही ते म्हणाले.- 'डिफकनेक्ट २०२४' या चर्चासत्रात त्यांनी मंगळवारी सांगितले की, लष्करी सामुग्रीच्या आयातीवर अवलंबून राहिल्याने गतकाळात देशाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. देशात आता १ लाख कोटी रुपयांच्या संरक्षण सामुग्रीचे उत्पादन झाले आहे. २०१४ साली हे प्रमाण ४४ हजार कोटी इतके होते.शस्त्रे, लष्करी उपकरणांची स्वदेशात अधिकाधिक निर्मिती झाली तरच आपण सामरिक क्षमता नीट टिकवून ठेवू शकतो. त्या दिशेने आम्ही प्रयत्न केले व त्याचे सकारात्मक परिणामही दिसून आले.

# जिल्हा वृत्तपत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु : आ. दिपक चव्हाण

**फलटण** : ''जिल्हा स्तरावरुन प्रसिद्ध होणार्या विशेषत: छोट्या वृत्तपत्रांच्या प्रश्नांकडे यापूर्वीही आपण शासनाचे लक्ष वेधले होते. त्याचा पाठपुरावा करुन जिल्हा वृत्तपत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण निश्चितपणे प्रयत्न करु. यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती आ.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्यासमवेत महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक संघ व महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या पदाधिकार्यांची बैठक आयोजित करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत'', असे फलटण - कोरेगांव विधानसभा मतदारसंघाच आमदार दिपक चव्हाण यांनी सांगितले.

येथील महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक संघ व महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या कार्यालयास आ.दिपक चव्हाण यांनी भेट देवून जिल्हा वृत्तपत्र संपादकांसमवेत त्यांच्या प्रश्नांबाबत चर्चा केली. सदर चर्चेदरम्यान महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक संघ व महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष रविंद्र बेडकिहाळ यांनी , ''शासकीय जाहिरात वितरणात 'क' वर्गातील वृत्तपत्रांवर अन्याय होत आहे. शासनाकडून छोट्या वृत्तपत्रांसंबंधी विविध अटी लावल्या जात असल्याने या छोट्या वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. राज्यातील पत्रकारांच्या प्रश्नांबाबत शासनाने नियुक्त केलेल्या अभ्यासगटात छोट्या वृत्तपत्रांचा व पश्चिम महाराष्ट्राचा एकही प्रतिनिधी नसून हे अन्यायकारक आहे. शासकीय अधिस्वीकृती पत्रिका, ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना आदी सुविधांमध्ये विविध जाचक अटी आहेत. या सर्व प्रश्नांकडे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधून राज्यातील जिल्हा वृत्तपत्रांना उचित न्याय मिळवून द्यावा'', अशी मागणी आमदार दिपक चव्हाण यांना केली. त्यावर बोलताना आ.दिपक चव्हाण यांनी वरील आश्वासन दिले.

प्रारंभी आ.दिपक चव्हाण यांचे रविंद्र बेडकिहाळ यांनी 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची प्रतिमा देवून स्वागत केले. त्यानंतर जिल्हा वृत्तपत्रांच्या प्रश्नांबाबतचे सविस्तर निवेदन आ.चव्हाण यांना सादर करण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेत महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक सहकारी संघाचे संचालक बापुराव जगताप, ॲड.रोहित अहिवळे, सौ.अलका बेडकिहाळ, रोहित वाकडे, प्रसन्न रुद्रभटे, फलटण तालुका वृत्तपत्र संपादक संघाचे अध्यक्ष विशाल शहा, कृष्णात उर्फ दादासाहेब चोरमले, प्रशांत अहिवळे यांनी सहभाग घेतला. नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनावेळी विधानसभा तालिका अध्यक्ष म्हणून आ.दिपक चव्हाण यांनी केलेल्या कामकाजाबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या विश्वस्त सौ.अलका बेडकिहाळ, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक सहकारी संघाचे प्रशासकीय संचालक अमर शेंडे उपस्थित होते.

# शांती, समता व बंधूताच्या प्रचार - प्रसारासाठी पालखी सोहळा पत्रकार संघाला रौप्यपदक जाहिर

## राजस्थान राज्यपालांच्या हस्ते ७ मार्चला जयपूर येथे वितरण

**फलटण** : शांती , समता व बंधूता या संत विचारांच्या प्रचार व प्रसारासाठी गेली ३० वर्षे कार्य करणा-या पालखी सोहळा पत्रकार संघाला जयपूर (राजस्थान)च्या रुप नारायण छीपा फाऊंडेशनचे रौप्यपदक जाहिर झाले असून राजस्थानचे राज्यपाल श्री कलराज मिश्र यांच्या हस्ते व राज्यसभेचे उपसभापती घनश्याम तिवाडी यांच्या अध्यक्षतेखाली जयपूर येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

जयपूर येथील रुप नारायण छीपा फाऊंडेशनच्या वतीने ज्ञान, विज्ञान, कला, क्रीडा, साहित्य, अध्यात्म व औद्योगिकीकरण आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या देशभरातील विविध संस्थाना सुवर्ण व रौप्यपदक पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. यंदाचा अध्यात्मिक क्षेत्रातील कार्यासाठीचा पुरस्कार पालखी सोहळा पत्रकार संघाला जाहीर झाला आहे.

या पुरस्कारासाठी भगवानदास राठी, चंद्रदीप मेडतवाल, अशोककुमार छीपा व आशीष नामदेव ही चार सदस्यीय कमिटी कोणाचाही प्रस्ताव न मागविता देशभरातील प्रसार माध्यमात प्रसिध्द झालेले लेख व बातम्याद्वारे संस्थांचे परिक्षण करते व पुरस्काराची घोषणा करते. पालखी सोहळा पत्रकार संघाने भागवत धर्म प्रसारक मंडळ, नामदेव समाजोन्नती परिषद व श्री नामदेव दरबार कमिटी, घुमाण (पंजाब) या संस्थांच्या सहकार्यातून गेल्या दोन वर्षापासून शांती, समता व बंधूता या संत विचारांच्या वारकरी सांप्रदायाचा श्री क्षेत्र पंढरपूर (महाराष्ट्र) ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या सुमारे २५०० किलोमिटर सायकल यात्रेच्या माध्यमातून प्रचार व प्रसार केला आहे . या कार्याची दखल घेवून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार गुरुवार दि. ७ मार्च रोजी सकाळी १० . ३० वाजता उत्सव, माहेश्वरी जनउपयोगी भवन, विद्यानगर, जयपूर येथे प्रदान करण्यात येणार असल्याचे पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी सांगितले.

# गावठी दारू विक्री करणाऱ्यांवर नारायणगाव पोलिसांची कारवाई

**नारायणगाव (सा.वा.)** : नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीत हिवरे तर्फे नारायणगाव व धनगरवाडी या ठिकाणी गावठी दारू विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करण्यात आली असून त्याच्याकडे सापडलेली १२ हजार ८००रुपये किमतीची गावठी दारू जप्त करण्यात आली आहे.




याप्रकरणी मारूती साळवे (रा. हिवरे तर्फे नारायणगाव) याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान हिवरे तर्फे नारायणगाव व धनगरवाडी येथे गावठी दारू विकली जात असल्याची माहिती नारायणगाव पोलीस स्टेशनला मिळाल्याने सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे, विनोद धूर्वे , पोलीस हवालदार संतोष कोकणे, पोलीस नाईक मंगेश लोखंडे, पोलीस नाईक दत्ता तळपाडे , पोलीस नाईक आदिनाथ लोखंडे, पोलीस शिपाई गोरक्ष हासे , सत्यम केळकर, सचिन सातपुते, सोमनाथ डोके, गोविंद केंद्रे, गंगाधर कोतकर, महीला पोलीस शिपाई धनश्री डोके, पोलीस पाटील खोकराळे या पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून हिवरे तर्फे नारायणगाव, धनगरवाडी इत्यादी ठिकाणी छापे टाकून एकूण १२,८०० रुपये किमतीची १६० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली असून दारू विक्री करणारा आरोपी मारुती साळवे रा. हिवरे तर्फे नारायणगाव यास अटक करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद धुर्वे करीत आहेत.

# ऑल इंडिया काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी ज्ञानेश्वर कांबळे यांची निवड

**हडपसर** : ऑल इंडिया काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती जमाती वीभाग राष्ट्रीय काँग्रेस पक्ष महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी हडपसर मधील माजी स्विकृत सदस्य, प्रथम शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून नियुक्तीचे पत्र ऑल इंडिया काँग्रेस कमिटी एस.सी.विभाग राष्ट्रीय अध्यक्ष अनुसूचित जाती , जमाती काँग्रेस पक्ष अध्यक्ष राजेश लिलोथिया यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले व काँग्रेस पक्षाचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



निवड झाल्यावर ज्ञानेश्वर कांबळे म्हणाले की, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाचे काम करणार आहे.मी काँग्रेस पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता असून पक्षाने माझ्यावर मागासवर्गीय अनुसूचित जाती जमाती काँग्रेस पक्ष महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती करण्यात आल्याने मी महाराष्ट्र मधील अनुसूचित जाती जमाती वर्गाचे विविध प्रश्न काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सोडविणार आहे.

## शासकीय योजनांचा तपशील खाजगी संस्थांकडे

# सरकारी प्रचाराविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार : सतेज पाटील

**कोल्हापूर** : शासकीय योजनांसाठी संकलित केलेला डाटा खाजगी कॉल सेंटर कडे उपलब्ध होणे ही गंभीर बाब आहे. शिवाय त्या माध्यमातून भाजप व पंतप्रधान मोदी यांचा नामोल्लेख करीत प्रचार सुरू आहे. या प्रकाराबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार आहे, अशी माहिती काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली.



ते म्हणाले, गेल्या दोन-तीन दिवसापासून उज्वला गॅस योजना, पीएम किसान योजना या संदर्भातील दोन्ही ध्वनीमुद्रीत संदेश समाज माध्यमात अग्रेषित होत आहेत. खाजगी कॉल सेंटरकडून संबंधित लाभार्थीना दोन्ही ध्वनिचित्रफीत पाठवताना त्यामध्ये भाजप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नामोल्लेख केला आहे. वास्तविक शासकीय योजनांसाठी संकलित केलेली माहिती ही शासकीय मालकीची असते. पण ती खाजगी कॉल सेंटर आणि विशिष्ट पक्षाकडे कशी उपलब्ध झाली हा गंभीर मुद्दा आहे. भाजपच्या या प्रचार पद्धतीवर करून आमदार पाटील यांनी संशय व्यक्त करीत तक्रार करण्याचा इशारा दिला आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप योग्य रीतीने आणि गतीने सुरू आहे. या उलट महायुतीमध्ये गडबड आहे. ती हळूहळू बाहेर पडेल. जागा वाटपाबाबत हुकमी एक्का महाविकास आघाडीकडे आहे, असेही विधान त्यांनी केले.

राज्याच्या इतिहासात विधिमंडळ परिसरात हाणामारीच्या घटना कधी घडल्या नाहीत. आता सत्ताधारी आमदारांमध्ये हाणामारी होणे हे परंपरेच्या दृष्टीने वाईट आहे. अशा महत्त्वाच्या घटना घडूनही त्याचे सीसीटीव्ही नोंदणीचे तपशील उपलब्ध नसणे ही सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे पाटील यांनी नमूद केले.

# महाबळेश्वर अर्बन बँक निवडणूक नवोदितांची मुसंडी

महाबळेश्वर - तालुक्याची अर्थवाहिनी समजल्या जाणाऱ्या दि महाबळेश्वर अर्बन को ऑप बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी १३ जागांसाठी २७ उमेदवार रिंगणात उतरल्याने निवडणूक चुरशीची ठरली होती.

दि.३मार्च रोजी झालेल्या निवडणुकीत ३३२९ सभासदांनी आपला हक्क बजावला होता

**आज जाहीर झालेल्या मतमोजणचा निकाल पुढीलप्रमाणे**

सर्वसाधारण प्रवर्गा

विजयी उमेदवार १) राजेश विश्वनाथ कुंभारदरे २०१९ मते. २) दत्तात्रय वाडकर १५१५ मते. ३)शरद बावळेकर १४८८ मते. ४)सतिष ओंबळे १४६० मते. ५)समिर सुतार १४१७ मते.६) चंद्रकांत बावळेकर १३३० मते.७)नदिम शारवान १३२१ मते.८)संपत जाधव १२६५ मते.

पराभूत उमेदवार

१) विद्यमान संचालक,बाळकृष्ण कोंढाळकर १२३२ मते.

२) गजानन फळणे १०९९ मते.

३) विद्यमान संचालक, युसूफ शेख,१२५६ मते.

४) विद्यमान संचालक,इरफान शेख ९२७ मते

५) सैफ वारुणकर ९४१ मते.

६)विजय साळवी ८८५ मते.

७) राजेंद्र पवार ८७२ मते.

सर्वसाधारण महिला प्रवर्ग

विजया उमेदवार

१) मनिषा पार्टे १७९२ मते.

२) उषा ओंबळे ९६६ मते.

पराभूत उमेदवार

१) सुनिता पाटणे ९३९ मते.

२) मेघा ढेबे ७८० मते.

इतर मागासवर्ग प्रवर्ग

विजयी उमेदवार

१) जावेद वलगे १९१२ मते.

पराभूत उमेदवार

१) विद्यमान संचालक,सचिन धोत्रे १०४४ मते.

भटका विमुक्त प्रवर्ग

विजयी उमेदवार

१) प्रशांत कात्रट १६६५ मते.

पराभूत उमेदवार

१) सुहास ढेबे १०४४ मते.

अनुसूचित जाती जमाती प्रवर्ग

विजयी उमेदवार

१) अनिल साळुंखे ८९७ मते.

पराभूत उमेदवार

१) किरण शिंदे ६५९ मते.

२) विद्यमान संचालक,नंदकुमार वायदंडे ६०५ मते.

३) विजय गायकवाड ३४९ मते

निवडणूकीचा निकाल पाहता ज्या विद्यमान संचालकांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे मत काही जाणकार सभासदांकडून व्यक्त केले जात आहे.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती. अनुराधा पंडीतराव, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुभाष पवार तसेच चतुर साहेब व सुहास आमराळे यांनी परिश्रम घेतले.

# पाटण पुरवठा विभागामार्फत अंत्योदय कुटुंबात एक साडीचे मोफत वाटप

**पाटण** : सध्या शासनाकडून पुरवठा विभागामार्फत प्रती अंत्योदय कुटुंबात एका साडीचे मोफत वाटप सुरू आहे. त्याचंच एक भाग म्हणून आज पाटण चे प्रांताधिकारी सुनील गाढे व तहसीलदार अनंत गुरव यांनी पाटण शहरातील कातकरी वस्तीमध्ये भेट देऊन अंत्योदय कुटुंबातील १५ कातकरी महिलाना साड्यांचे थेट घर पोहोच वितरण केले .याच पद्धतीने बिबी येथील कातकरी वस्तीमध्ये देखील साड्यांचे वितरण प्रांताधिकारी सुनील गाढे यांचे हस्ते करण्यात आले.



पाटण मध्ये सुमारे ३००० पेक्षा अधिक कुटुंब अंत्योदय यादीत असून घरटी एक साडी मोफत वितरणाचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी दिली आहे. पुरवठा विभागाकडून अशा पद्धतीने प्रथमच साड्यांचे वितरण स्वस्त धान्य दुकानातून होत असल्याने नागरिकांमध्ये विशेषतः महिलांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण दिसून आले आहे.

# सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी येथे उद्या बुधवार ६ मार्च रोजी

**सातारा** : इंडिया आघाडीतील घटक पक्ष व परिवर्तन वादी, पुरोगामी विचारांच्या संघटनांची आणि ६० निमंत्रित प्रतिनिधीं चे उपस्थितीत सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी येथे उद्या बुधवार ६ मार्च रोजी होणार असून या बैठकीला माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे नेते आ.पृथ्वीराज बाबा चव्हाण, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार श्रीनिवास पाटील, माजी मंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, शिवसेनेचे उपनेते नितीन बानुगडे पाटील, भारत पाटणकर, लक्ष्मण माने आदी प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. केंद्रातील भाजपा सरकारच्या द्वेषमूलक, भ्रष्ट कारभारामुळे भारतातील जनतेचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, जीवन उद्ध्वस्त झाले आहे. तसेच केंद्राच्या दडपशाही गैर कारभारविरोधात आपला पक्ष संघटना व आपण सर्व संघर्ष करीत आहोत. विविध स्तरातील या संघर्षाला देशपातळीवर इंडिया आघाडी चे नावान आगामी लोकसभा निवडणुकीच्या साठी संघटित झाले आहे. या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील सर्व पुरोगामी व धर्म निरपेक्ष पक्षाची जिल्हास्तरावरील सर्व घटक पक्ष व पुरोगामी विचारांच्या संघटनांची महत्वाची बैठक बुधवार दिनांक ६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा काँग्रेस कमिटी येथे होणार आहे.

# दोन महिन्यांत वाढले पावणेसहा लाख मतदार; निवडणुकीपूर्वी आणखी दोन लाख वाढणार

**पुणे** : गेल्या दोन महिन्यांत राज्यात तब्बल पावणेसहा लाख नवमतदारांची भर पडली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी आणखी दोन लाख मतदारांची नावे समाविष्ट करण्यात येणार आहेत. याच काळात सुमारे १ लाख ८७ हजार नावे वगळण्यासाठी अर्ज प्राप्त झाले असून आतापर्यंत १ लाख नावे वगळण्यात आली आहेत. मतदार नोंदणीसाठी सुरू असलेल्या सततच्या मोहिमेमुळे नवमतदारांची संख्या वाढल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

लोकसभा निवडणुका लवकरच जाहीर होणार असल्याने निवडणूक कार्यालयांना निर्धारित वेळेत अर्ज भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गेल्या महिन्यात, राज्याला मतदार नोंदणी, नावे वगळणे आणि नाव-पत्ता बदलासाठी एकूण १४ लाख ७१ हजार लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. यातील सर्व प्रकारांमधील ९ लाख ८४ हजार अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे.

त्यात नवमतदारांची संख्या ५ लाख ७३ हजार ८९१ असून १ लाख ४ हजार ६४४ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. यात सर्वाधिक ९५ हजार ३९५ नवमतदारांनी ठाणे जिल्ह्यात अर्ज केले आहेत.

त्यापैकी ७१ हजार ५२२ मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत, तर ९१ हजार ६९३ नवमतदारांनी पुणे जिल्ह्यात अर्ज केले आहेत. त्यापैकी ६२ हजार ३१८ मतदारांचे अर्ज स्वीकारण्यात आले आहेत, तर अजूनही २२ हजार ६१२ अर्जांवर कार्यवाही सुरू आहे.

# करड उत्तर भागाला दुष्काळाच्या झळा

## धनगरवाडी उपसा सिंचन योजनेचे पाणी न सोडल्यास मतदानावर बहिष्कार : ग्रामस्थांनी घेतला निर्णय

मसूर : कराड उत्तर मधील मसूरचा पूर्व भाग उन्हाळ्याच्या प्रारंभीच दुष्काळाच्या झळांनी अक्षरशः होरपळत चालला आहे. या भागातील धनगरवाडी उपसा सिंचन योजनेचे काम पूर्ण होऊनही अद्याप या विभागात पाणी सोडण्यात आले नाही. जर मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात पाणी न सोडल्यास निगडी, घोलपवाडी, पाडळी, गायकवाडवाडी, साठेवाडी, आर्वी, नागझरी ही गावे येत्या लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार घालणार आहेत. तसा ठराव करून प्रशासनाला पाठवणार असल्याचे या



गावातील ग्रामस्थांनी सांगितले.

उन्हाळ्याच्या सुरुवातीस उन्हाळ्याची दाहकता वाढली. त्या अनुषंगाने पाणीटंचाईच्या झळा मसूर पूर्व विभागातील गावांना बसण्यास सुरुवात झाली आहे. पाणी मिळण्यासाठीची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सिंचन योजनेखाली येणाऱ्या गावातील ग्रामस्थांनी कराड उत्तरचे भाजपचे नेते मनोज घोरपडे यांचे उपस्थितीत संबंधित प्रशासनास निवेदन दिले आहे. संबंधित अभियंता घनवट यांच्याकडे याबाबत तक्रार व मागणी केली. मार्च अखेर पाणी सोडले जाईल असे आश्वासन त्यांनी दिले आहे. मात्र पंप हाउस २ चे काम झाले नसल्याने निगडी, घोलपवाडी, साठेवाडी, आर्वी व नागझरी आदी गावांना त्याचा लाभ मिळणार नसल्याची माहिती समजत आहे. सदर गावांसाठी तात्पुरती पर्यायी व्यवस्था केल्यास या गावांमधील दुष्काळाची दाहकता कमी होऊ शकेल. अन्यथा सर्व गावातील ग्रामस्थांसह जनावरांना सुद्धा पाण्यासाठी भटकंती करावी लागणार आहे.

यावर्षी चांगला पाऊसकाळ झाला नसल्याने भविष्यात १९७२ पेक्षा तीव्र दुष्काळ जाणवेल अशी भीती व्यक्त केली जात आहे. सध्या मसूर पूर्व भागात दुष्काळाची दाहकता मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे. परिसरातील तलाव कोरडे ठणठणीत पडले आहेत. याची दखल प्रशासनासह लोकप्रतिनिधिंनी घेऊन मार्चच्या दुसऱ्या आठवड्यातच पाणी सोडण्याची कार्यवाही करावी. सध्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शिवाय कमी पावसामुळे खरिपासह रब्बी हंगामातील पीक उत्पादनाला मोठा फटका बसला आहे.

दुष्काळग्रस्त शब्द आमच्या पाचवीलाच पुजलेला.....

कराड उत्तरचा पूर्व भाग दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. त्यामुळे दुष्काळग्रस्त हा शब्द पाचवीलाच पुजला असल्याची स्पष्टोक्ती ग्रामस्थांनी केली आहे. सध्या या परिसरात १९७२ सारखी दुष्काळाची दाहकता जाणवू लागली आहे. धनगरवाडी उपसा सिंचन योजनेतून तलावात पाण्याची उपलब्धता करून द्यावी अशी मागणी संभाजी माने, कृषीपंडित दिनकरराव पाटील, विलासराव घोलप, संदीप गायकवाड, संभाजी पवार, रवींद्र जाधव, संदीप भोसले, तात्यासो फडतरे, अर्जुन घोलप, अशोकराव पवार, शहाजी घोलप, मोहन शिंदे आदीं ग्रामस्थांनी केली आहे.

मुख्य "संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. ("पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# नगरोथान महाभियानांतर्गत कोरेगाव शहराच्या रस्ते विकास प्रकल्पाला मान्यता

## ५२ कोटी ५४ लाख रुपयांच्या निधीची तरतूद, ना. महेश शिंदे यांच्या विशेष प्रयत्नांना यश

**कोरेगाव :** राज्य सरकारने नगरोथान महाभियानांतर्गत कोरेगाव शहराच्या रस्ते विकास प्रकल्पाला मान्यता दिली आहे. त्यासाठी ५२ कोटी ५४ लाख रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. या प्रकल्पामध्ये कोरेगाव शहरातील शहराला जोडणाऱ्या रस्त्यांची आणि रिंग रोडचे काम मार्गी लागले असून कोरेगाव शहरात प्रवेश करताना आता एखाद्या महानगरामध्ये प्रवेश करत असल्यासारखे निश्चितपणे जाणवणार आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी केलेल्या विशेष पाठपुराव्यामुळे राज्य सरकारने या प्रकल्पास मान्यता दिली आहे.

कोरेगाव विधानसभा मतदारसंघाची राजधानी असलेल्या कोरेगाव शहराला पूर्णपणे ट्रीमिक्स कॉंक्रिटीकरण रस्ते आणि बंदिस्त गटारे करण्याचा ठाम निर्धार २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर ना. महेश शिंदे यांनी केला होता. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत कोरेगाव नगरवासियांनी नगरपंचायतीची सत्ता मोठ्या विश्वासाने ना. महेश शिंदे यांच्याकडे सोपविली होती. अत्यंत काटेकोर नियोजन, शहरवासियांना दृष्टीसमोर ठेवून केलेली प्रकल्पांची रचना यामुळे शहरातील एकही रस्ता आता ट्रीमिक्स कॉंक्रिटकारणाशिवाय शिल्लक राहिलेला नाही. शहरात प्रवेश करत असताना चांगले रस्ते असावेत, त्याचबरोबर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ना. महेश शिंदे यांनी सहकारी पदाधिकारी व नगरसेवकांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून रिंग रोडची रचना केली होती. त्यानुसार त्यांनी प्रस्ताव राज्याचे मुख्यमंत्री व नगरविकास विभागाचे मंत्री असलेले ना. एकनाथ शिंदे यांच्याकडे सादर केला होता.

### संभाजीनगर परिसर होणार हायटेक; शेतकऱ्यांना हक्काचा रस्ता मिळणार

**ना. महेश शिंदे यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या कुमठे फाटा- एकंबे रस्ता -संभाजीनगर -रहिमतपूर रस्ता या रिंगरोडमुळे खऱ्या अर्थाने संभाजीनगर परिसराचा परिपूर्ण विकास होणार आहे. हा परिसर एकदम हायटेक बनणार असून चौथाई विभागातील शेतकऱ्यांना आपल्या शेताकडे जाण्यासाठी आणि शेतीमालाची ने आण करण्यासाठी आता प्रशस्त रस्ता उपलब्ध होणार आहे. कोरेगाव शहराचा विस्तार आता पूर्वीच्या दिशेला होत असून संभाजीनगर नजिकच्या काळात शहराच्या केंद्रस्थानी येणार आहे. एकूणच या रिंगरोडमुळे कोरेगाव शहरातील शिवाजीनगर -सद्गुरु नगर -शिंदे कॉलनी- साईनगर -संभाजीनगर सुभाषनगर व शाहूनगर या परिसरासह आसरे, कुमठे, गोळेवाडी, बागलकोट, सुलतानवाडी, न्हाळेवाडी व एकसळ या गावांचा खऱ्या अर्थाने विकास होणार आहे.**

उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी या प्रकल्पासाठी पाठपुरावा केला होता. त्यानुसार नगरविकास विभागाने कोरेगाव शहराच्या रस्ते विकास प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली आहे. या संदर्भातला शासन निर्णय उपसचिव श्रीकांत आंडगे यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आला आहे.

सातारा लातूर राष्ट्रीय महामार्गावरील कुमठे फाटा ते एकंबे रस्ता ते संभाजीनगर ते रहिमतपूर रस्ता असा भला मोठा आणि प्रशस्त रिंग रोड होणार आहे. त्यासाठी प्रत्येक टप्प्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. कुमठे फाटा ते एकंबे रस्ता यासाठी पाच कोटी २३ लाख ६६ हजार पाचशे चार रुपये, पी.के. बर्गे यांच्या शेतापासून ते रहिमतपूर रस्ता सात कोटी ९९ लाख २० हजार ३२८ रुपये, पंचायत समिती कार्यालयापासून ते एकंबे रस्त्यावरील इस्कॉन मंदिरापर्यंत तीन कोटी ५३ लाख ८२ हजार ३४७ रुपये, इस्कॉन मंदिर ते एकंबे रस्ता तीन कोटी २९ लाख १२ हजार २५६ रुपये, एकंबे रस्ता ते पी. के. बर्गे शेत या रस्त्यासाठी तीन कोटी ८१ लाख २३ हजार ७६९ रुपये, संभाजीनगर ते पी. के. बर्गे शेत

पाच कोटी ७१ लाख २४ हजार २२ रुपये, रहिमतपूर रस्ता ते औद्योगिक वसाहत सुलतानवाडी रस्ता यासाठी सात कोटी ९७ लाख ७८ हजार ४२३ रुपये अशी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

तिळगंगा सुशोभीकरण प्रकल्पातील महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू असलेल्या जुना मोटर स्टॅन्ड नजीक महादेव नगर येथील हनुमान मंदिरापासून ते आसरे ते कुमठे असा विस्तारित रस्ता तयार केला जाणार असून त्यासाठी

चार कोटी २२ लाख ४१ हजार ९०५ रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या रस्त्यामुळे भाडळे खोऱ्यातील लोकांना थेट कोरेगाव शहरात येता येणार आहे. येत्या १८ महिन्यांमध्ये हे काम पूर्ण केले जाणार असून शहरातील वाढती रहदारी लक्षात घेऊन तसे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ना. महेश शिंदे यांनी दिली.

कुमठे फाटा -एकंबे रस्ता- संभाजीनगर- सुभाष नगर- रहिमतपूर रस्ता या नवीन रिंग रोडमुळे भाडळे खोरे हे एकसळ शिरंबे परिसराला थेट जोडले जाणार आहे. एकसळ ते शिरढोण या रस्त्यामुळे या भागातील रहिवासी व शेतकऱ्यांना थेट साताऱ्याला जाणे सोयीस्कर होणार आहे. एकूणच रस्ते विकासाद्वारे कोरेगावचा सर्वांगीण विकास करण्याचा घेतलेला निर्णय पूर्णत्वास जात असल्याचे समाधान आहे, असेही ना. महेश शिंदे यांनी निदर्शनास आणून दिले.

कोरेगाव शहरातील ९९ टक्के रस्ते हे ट्रीमिक्स कॉंक्रिटीकरण व बंदिस्त गटारांद्वारे पूर्ण करण्यात आले आहेत. उर्वरित रस्ते शिल्लक असल्यास अथवा रहिवाशांना नव्याने रस्ता तयार करून घ्यायचा असल्यास त्यांनी तात्काळ आपले प्रस्ताव व आवश्यक कागदपत्रे कोरेगाव रेल्वे स्टेशन असलेल्या जनसंपर्क कार्यालयात सादर करावेत. लवकरात लवकर हे प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत निर्णय घेऊन तातडीने निधीची तरतूद करून घेता येणे शक्य होणार आहे. नागरिकांनी रस्ते विकासाची ही संधी दवडू नये, असे आवाहन ना. महेश शिंदे यांनी केले आहे.

# चोरीस गेलेल्या स्टीलचा ३ तासात छडा

## कराड ग्रामीणच्या डीबी पथकाची कारवाई

**कराड :** कालेटेक ता. कराड येथुन चोरीस गेलेल्या स्टीलचा ३ तासात छडा लावून कराड ग्रामीण पोलिसांच्या डीबी पथकाने आरोपीला वाहनांसह अटक करून मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक आचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल ठाकुर यांनी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी सातारा जिल्ह्यातील सर्व अधिकारी यांना मिटींगमध्ये सुचना व मार्गदर्शन केले होते. दिनांक २ मार्च रोजी तक्रारदार नामे विकास जगन्नाथ पाटील, वय ५० वर्ष, रा. कासेगांव ता. वाळवा, जि. सांगली यांनी तक्रार दिली होती की, दिनांक १ मार्च रोजीचे रात्री १० ते दिनांक २ रोजीचे सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास कालेटेक ता. कराड येथील डी.पो. जैन कंपनीचे गेटजवळ उघड्यावरील ९० हजार रूपये किंमतीचे दिड टन वजनाचे स्टिल अज्ञात आरोपीने चोरुन नेले आहे म्हणून वगैरे तक्रारी वरुन कराड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सदरचा गुन्हा उघडकीस आणणोकामी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल ठाकुर व कराड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांचे सुचनेनुसार काल दि. २ मार्च २०२४ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अंमलदार नितीन येळवे, उत्तम कोळी, सचिन निकम, सज्जन जगताप, प्रफुल्ल गाडे, यांना मिळालेल्या बातमीनुसार त्यांनी पाचवड फाटा ता. कराड येथे सापळा लावला. त्यामध्ये नमुद गुन्हयातील संशयित आरोपी नामे सुखदेव सर्जेराव मोरे मुळ रा. भवानीनगर ता. बाळवा जि.सांगली सध्या रा. कालेटेक ता. कराड हा त्याचे ताब्यातील वाहन क्रमांक एम. एच. ५० एन. ५०७० यामध्ये नमूद गुन्हयातील चोरीस गेलेला माल विक्री करणे करिता घेवून जात असताना त्यास तेथेच पकडुन सदर गुन्हयातील वापरलेले वाहन व मालासह एकुण ३ लाख ९० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपी याचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक आचंल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल ठाकुर तसेच पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अमलदार नितीन येळवे, उत्तम कोळी, सचिन निकम, सज्जन जगताप, प्रफुल्ल गाडे यांनी केली असुन पुढील तपास हवालदार उत्तम कोळी करत आहेत.

# वडूजमध्ये महाशिवरात्री निमित्त मंगळवारपासून विविध धार्मिक कार्यक्रम

वडूज : येथील हेमाडपंथी काशी विश्वेश्वर महादेव मंदिरात श्री महादेव मंदिर ट्रस्टच्या वतीने महाशिवरात्री निमित्त मंगळवार ५ ते शनिवार ९ मार्चपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

महाशिवरात्री निमित्त मंगळवार दिनांक ५ पासून ते गुरूवार दिनांक ७ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण वाचन होईल. या दरम्यान दररोज सकाळी सहा वाजता रुद्राभिषेक करण्यात येईल. या दरम्यान मंगळवार दिनांक ५ रोजी दुपारी ४ ते ६ सद्गुरू भजनी मंडळ, वडूज यांचे भजन, तर रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत वडूज येथील संत ज्ञानेश्वर भजनी मंडळाचा जागर कार्यक्रम पार पडेल. बुधवार दिनांक ६ रोजी दुपारी ४ ते ६ श्री माऊली भजनी मंडळ, वडूज यांचे भजन तर रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत संत तुकाराम भजनी मंडळ, वडूज यांचा जागर कार्यक्रम होईल. गुरूवार दिनांक ७ रोजी दुपारी ४ ते ६ ब्रम्हचैतन्य महिला भजनी मंडळ, वडूज यांचे भजन तर रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत दत्त भजनी मंडळ, वडूज यांचा जागर कार्यक्रम पार पडेल. शुक्रवार दिनांक ८ रोजी सकाळी ८ वाजता श्री विश्वाराध्याय रूद्र मंडळ यांचे रूद्र पठण होईल. काशी विश्वेश्वर महादेव मंदिरात सायंकाळी ७ वाजता धार्मिक वातावरणात महाआरती हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत होईल तर रात्री ९ ते १२.२७ मिनिटापर्यंत संभाजी नगर येथील ह.भ.प. बाल किर्तनकार माऊली महाराज काकडे यांचे महाशिवरात्री किर्तन सोहळा संपन्न होईल. शनिवार दि.९ रोजी दुपारी १२.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत डॉ. संतोष अर्जुनराव गोडसे व परिवारातर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

तरी येथील हेमाडपंथी काशी विश्वेश्वर महादेव मंदिरात श्री महादेव मंदिर ट्रस्टच्या वतीने महाशिवरात्री निमित्त आयोजित केलेल्या सर्व धार्मिक कार्यक्रम, महाआरती आणि महाप्रसादाचा लाभ शिवभक्तांनी घेण्याचे आवाहन श्री महादेव मंदिर ट्रस्ट, समस्थ वडूजमधील नागरिक व

## नागपूरहून थेट मुंबईच्या वेशीपर्यंत आता नॉन-स्टॉप, समृद्धीचा तिसरा टप्पा होणार सुरू

**नाशिक :** समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे सोमवारी लोकार्पण होणार असून, मुंबईपर्यंतचा प्रवास आणखी कमी वेळेत होणार आहे. इगतपुरी इंटरचेंजचा वापर करून ठाणे, मुंबई परिसरातून शिर्डी येथे जाणाऱ्या भाविकांचा प्रवास सुलभ व जलद होईल व एका तासात शिर्डीला पोहोचता येईल. याशिवाय शिर्डी, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील सिन्नर व इगतपुरी परिसरातील शेतकऱ्यांना शेतीमालाच्या वाहतुकीसाठी मुंबई महानगर प्रदेशात येणे व जाण्यासाठी कमी कालावधी लागेल.

भरवीर ते इगतपुरी हा तिसऱ्या टप्प्यातील मार्ग २४.८७२ कि.मी. लांबीचा आहे. त्यामुळे ७०१ कि.मी. पैकी ६२५ कि.मी लांबीचा महामार्ग वाहतुकीस उपलब्ध झाला आहे. उर्वरित मार्गाचे (इगतपुरी ते आमने) काम प्रगतिपथावर आहे.

# सातारा जिल्हा आनंदाचा शिधा वाटपामध्ये महाराष्ट्रात आघाडीवर



**सातारा जिल्ह्यात आनंदाचा शिधावाटप करताना आमदार दीपक चव्हाण व आमदार जयकुमार गोरे यांच्या सोबत पुरवठा अधिकारी (छाया- निनाद जगताप)**

**सातारा:** महाराष्ट्र राज्यातील ट्रिपल इंजिन सरकारची कामगिरी तिप्पट वाढलेली आहे. अनेक प्रश्न मार्गी लावली जात आहे. सर्वसामान्यांना सरकार मान्य स्वस्त शिधा वाटप व्हावा. यासाठी आनंदाचा शिधा १५ जानेवारी २०२४ च्या सुधारित कार्यादेशानुसार वाटप करण्यात आलेला आहे. यामध्ये सातारा जिल्हा महाराष्ट्रात आघाडीवर आहे. असे सातारा जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने घेण्यात आलेली आकडेवारीतून सिद्ध झालेले आहे. फलटण येथे आमदार दीपक चव्हाण व मान खटाव मध्ये आमदार जयकुमार गोरे यांच्या हस्ते लाभार्थींना आनंदाचा शिध देण्यात आलेला आहे .या वेळेला पुरवठा अधिकारी उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यामध्ये एकूण कार्डधारकांची संख्या ४ लाख१७ हजार ४४८ आहे यापैकी स्वस्त धान्य दुकानातून ४ लाख१०१ शिधावाटप पत्रिका आहेत. यांना फेब्रुवारी महिन्यात ९५.८४ टक्के एवढ्या टक्केवारीने धान्य वाटप झालेले आहे.

श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा व छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सुधारित कार्यादेशानुसार सातारा जिल्ह्यात ३ लाख ९५ हजार१२८ संच आले. त्यापैकी तीन लाख ९१ हजार १७१ वाटप झालेले आहेत. व ३९५७ आनंदाचा शिधा शिल्लक आहे. यामध्ये लाभार्थ्यांच्या घराला कुलूप, लाभार्थी परगावी गेलेली आहेत व काही लाभार्थी मयत झाले आहेत. त्यामुळे अवघा एक टक्का शिधा वाटप राहिलेले आहे. उर्वरित ९९ टक्के सुधारित कार्यादेशानुसार आनंदाचा शिधा वाटप करण्यात आलेला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली शिधावाटप यंत्रणा कार्यरत आहे.

सातारा जिल्ह्यात एकूण १७१३ शिधावाटप दुकान आहेत. धान्य मंजुरी दिलेल्या दुकानांची संख्या १७८९ व धान्य पोहच झालेल्या दुकानांची संख्या दि ४ मार्च रोजी ७६९ म्हणजे पहिल्या आठवड्यात ४५ टक्के धान्यवाटप झालेले आहे. हे आकडेवारी चालू मार्च महिन्याचे आहे. उर्वरित वर्षभर शिधावाटप हा नियमित होत आहेत. सध्या सातारा जिल्ह्यात सर्व तालुक्यात पुरवठा शाखेच्या वतीने अत्यंत कार्यक्षमरित्या कामकाज होत असून नागरिकांनी कोणत्याही अफवे वर विश्वास ठेवू नये. असे काही शिधावाटप दुकानदारांनी माहिती दिली. दरम्यान,दिवाळी, दसरा, गुढीपाडव्या सारख्या सणासुदीला राज्यातील गरीब व गरजू शिधापत्रिकाधारकांना देण्यात येणारा 'आनंदाचा शिधा' योजनेला राज्यात चांगला प्रतिसाद लाभत असल्याने ही योजना वर्षभर राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना दिवाळी सणानिमित्त एक किलो साखर, एक लिटर तेल, प्रत्येकी अर्धा किलो परिमाणात रवा, चनाडाळ, मैदा व पोहा असे सहा वस्तूंचा समाविष्ट असलेला 'आनंदाचा शिधा' हा संच १०० रूपये दरात ई-पॉस प्रणालीद्वारे वितरित करण्यात आला आहे.

# भाटमरळी सोसायटीवर अजिंक्य पॅनेलचे वर्चस्व अबाधित



**सातारा :** सातारा तालुक्यातील राजकीय दृष्ट्या संवेदनशील असलेल्या भाटमरळी येथील श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले वि.का.स सेवा सोसायटीवर आमदार शिवेंद्रसिहराजे भोसले गटाच्या अजिंक्य ग्रामविकास पॅनलने विरोधी पॅनलचा १२-० असा धुव्वा उडवून सोसायटीवरील आपले निर्विवाद वर्चस्व कायम ठेवले.

सोसायटीचे नूतन संचालक जोतिराम चव्हाण, अरुण जाधव, राजेंद्र जाधव, संदेश जाधव, संतोष जाधव, रामचंद्र जंगम, विठ्ठल देशमुख, अनिकेत पवार, अर्चना जाधव, सुनिता जाधव, रविंद्र जाधव, अशोक बल्लाळ यांचा आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सुभाष पवार, हिंदराज जाधव, सयाजी चव्हाण, संभाजी जाधव, विनायक जाधव, नारायण क्षिरसागर, नितीन चव्हाण, केशव चव्हाण, जगन्नाथ चव्हाण, दिनकर पवार, सुरेश पवार, प्रशांत चव्हाण, संतोष देशमुख, प्रताप जाधव, अशोक जाधव, गणेश जाधव, मदेश जाधव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

सोसायटीच्या माध्यमातून सभासद शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत. विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून शेतकरी सक्षम होण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी याप्रसंगी केले.

# सांगोल्याजवळील गोदामातील स्फोटाची अखेर उकल

**सोलापूर :** सांगोला तालुक्यातील महूद येथे एका टायर गोदामात झालेल्या मोठ्या स्फोटाची उकल करण्यात अखेर सोलापूर ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. यात विम्याचा खोटा दावा करून मोठी रक्कम उकळण्याच्या हेतूने स्फोट घडविण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या कट कारस्थानाचा मुख्य सूत्रधार गोदामाचा मूळ मालक असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

गेल्या १ मार्च रोजी पहाटे दीडच्या सुमारास महूद येथे टायरच्या गोदामात स्फोट होऊन त्यात अतुल आत्माराम बाड ( वय २७, रा. विठलापूर, ता. आटपाडी, जि. सांगली) याचा जागीच मृत्यू झाला होता. तर दीपक विठ्ठल कुटे (वय २७, रा. शिवापुरी, ता. आटपाडी) हा गंभीर जखमी झाला होता. मृत अतुल याचा चुलत भाऊ आणि जखमी दीपक कुटे याचा मेव्हणा असलेला रामेश्वर दत्तात्रय बाड (वय ३४, रा. विठलापूर, ता. आटपाडी) याने महूद येथे नितीन पांडुरंग नरळे याच्या मालकीच्या जागेवर उभारलेल्या दोन गोदामांपैकी एक गोदाम भाड्याने घेतले होते. या गोदामात एमआरएफ कंपनीच्या टायरची दुरुस्ती आणि विक्री केली जात होती. तर मूळ मालक नितीन नरळे याच्याही मालकीच्या गोदामात टायर होते.

नरळे याने आपल्या गोदामासाठी ८० लाख तर आत्माराम बाड याने भाड्याने घेतलेल्या गोदामासाठी एक कोटी ६५ लाख रुपयांचा विमा उतरविला होता. या दोन्ही विम्यांचे दावे करून त्याप्रमाणे संबंधित विमा कंपनीची आर्थिक फसवणूक करण्याच्या हेतूने नितीन नरळे व आत्माराम बाड यांनी एकत्र येऊन आपल्या गोदामात स्फोट घडवून मालाचे नुकसान दर्शविण्यासाठी कट रचला होता. त्यासाठी आत्माराम बाड याने आपला चुलत भाऊ अतुल बाड आणि मेव्हणा दीपक कुटे यांनाही विम्याची रक्कम मिळाल्यास त्यात हिस्सा देण्याचे आमीष दाखवून कटात सहभागी करून घेतले होते, असे पोलीस तपासात निष्पन्न झाले.

सहायक पोलीस निरीक्षक पवन मोरे यांनी सादर केलेल्या तपास अहवालानुसार या स्फोटाची उकल झाली असून यात मुख्य कटाचा सूत्रधार नितीन नरळे हा स्फोट घडल्यापासून गायब झाला आहे. त्याचा शोध घेतला जात आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे व अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बी. एस. रणदाळे, सहायक पोलीस निरीक्षक पवन मोरे व आर. जी. राजूलवार हे पुढील तपास करीत आहेत.

# पानी फाउंडेशन आयोजित फार्मर कप स्पर्धेमध्ये पिंपरी माण तालुक्यात पहिले

**दहिवडी, :** पानी फाउंडेशन मार्फत राबविल्या गेलेल्या फार्मर कप या स्पर्धेमध्ये पिंपरी ता. माण जि. सातारा येथील यशवंत शेतकरी गटाने एक लाख रुपयाचे बक्षीस पटकाविले.

बालेवाडी क्रीडा संकुल, पुणे येथे सदर स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. या स्पर्धेसाठी राज्य भरातून ३४८ शेतकरी गट सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी काही अटी व नियम होते.

त्यामधे प्रामुख्याने सहभागी प्रत्येक शेतकरी गटाने शेतात उन्हामध्ये आडवी नांगरट करने, उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया, चिकट सापळे, कामगंध व प्रकाश सापळे यांचा वापर त्याचप्रमाणे पिकाची खुरपणी, कापणी व मळणी आणि फवारणी करताना इर्जिक् पद्धत वापरणे या गोष्टींचं समावेश होता.तसेच रासायनिक किंवा पेस्टी साईड न वापरता विषमुक्त शेती करणे. यशवंत शेतकरी गटामध्ये एकूण १९ सदस्य असून सर्वांनी एक जुटिने विषमुक्त शेती केली व एकूण १५.५० एकर क्षेत्रामध्ये ४८० क्विंटल एवढे विक्रमी मका उत्पादन घेतले. सहभागी शेतकऱ्यांमध्ये २० वर्ष पासून ६७ वर्ष वयोगट मधील लोकांचा सहभाग आहे. सर्वांनी इर्जिकं पद्धतीने शेती केल्यामुळे शेतीच खर्च कमी झाला व उत्पन्न वाढले. या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी पानी फाउंडेशनचे आमिर खान, किरण राव, डॉक्टर अविनाश पोळ, पिंपरी चिंचवड आयुक्त शेखर सिंह, एबीपी माझाचे खांडेकर, टिना गुप्ता, जॅकी श्रॉफ, सोनाली कुलकर्णी, पुणे उपजिल्हाधिकरी सौ. सुरेखा माने, सातारा कृषी अधिक्षक सौ. भाग्यश्री फरांदे उपस्थित होते.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पुणे जिल्हा महिला अध्यक्षपदी सुवर्णा माने यांची नियुक्ती



**हडपसर :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पुणे जिल्हा महिला अध्यक्षपदी सुवर्णा माने यांची नियुक्ती करण्यात आली. आहे हे नियुक्तीपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष.व महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर कांबळे. शशिकांत सोनवणे. डॉ. शांताराम कारंडे. मंगेश गायकवाड .अनिल गायकवाड. मनीषा तिखे . सुखदेव आबनावे आदि यावेळी उपस्थित होते.

यावेळी माने म्हणाल्या की,संघटनेच्या माध्यमातून महिलांच्या विविध समस्यां सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे.

## भाजून जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू

**सातारा :** भाजून जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची नोंद भुईंज पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, माया ज्ञानेश्वर गायकवाड रा. वेळे, ता. वाई जि. सातारा ही महिला भाजल्याने उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दि. ११ फेब्रुवारी रोजी ॲडमिट झाली होती. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याची नोंद भुईंज पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कोलवडकर करीत आहेत.

## विवाहिता बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून विवाहिता बेपत्ता झाल्याची नोंद शाहूपुरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २ मार्च रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास बुधवार पेठ येथे राहणारी आसमा अमीर शेख ही विवाहिता भाजीचे दुकान लावण्यासाठी गेली असता दुकान न लावता बेपत्ता झाली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार डमकले करीत आहेत.

## महिलेच्या पर्समधून सुमारे ६५ हजारांची चोरी

**सातारा :** महिलेच्या पर्स मधून अज्ञात महिलेने सुमारे ६५ हजारांची चोरी केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास वैष्णवी सागर खोले, रा. सदाशिव पेठ, खण आळी, सातारा यांच्या पार्किंग मधील लावलेल्या गाडी च्या हँडलवर असलेल्या पर्स मधून अज्ञात महिलेने रोख रकमेसह सोन्याचे दागिने तसेच बँकेची कागदपत्रे असे मिळून ६५ हजार ५०० रुपयांची चोरी केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार माने करीत आहेत.

## नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणी आणखी एकाला अटक; आरोपींची शोध मोहीम सुरू

**अहमदनगर:** नगर अर्बन कर्ज घोटाळा प्रकरणी सावेडी येथील आणखी एकाला आर्थिक गुन्हे शाखेने रविवारी ( दि. ४ ) अटक केली. अविनाश प्रभाकर वैकर ( रा.रासने नगर सावेडी अहमदनगर ) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणाचा तपास शहर विभागाचे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. अमोल भारती यांनी आरोपींचा शोध घेण्याची मोहीम सुरू केली असून, त्यांच्या पथकाने सवेडी उपनगरातील आणखी एकाला अटक केली. या प्रकरणातील इतर आरोपी पोलिसांच्या रडारवर आहेत.

# साहित्यिकानी निर्भिडपणे ठाम भूमिका घेत लेखन करणे आवश्यक : डॉ. शेख भिन्ने

**पुणे :** संपूर्ण भारतातील साहित्यिक हे भूमिका घेऊन लिहीत नाहीत. भूमिका घेऊन लिहिणे हे फार महत्त्वाचे आहे. आज पर्यंतच्या जेवढ्या जेवढ्या क्रांत्या झाल्या त्या केवळ कवी व साहित्यिकांनी केलेल्या आहेत. निर्भीडपणे ठाम भूमिका घेऊन साहित्यिकांनी आज लिहिण्याची आवश्यकता आहे. अशी खंत मुस्लिम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळ व विश्व गझल परिषदेचे अध्यक्ष डॉ. शेख इकबाल मिन्ने यांनी व्यक्त केले.

बाजीगर साहित्य सेवा प्रतिष्ठान आंधळीच्या वतीने चौथे साहित्य संमेलन व सिराज शिकलगार यांच्या दीवान ए सिराज व चार गजलसंग्रहाच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुणे येथील एरंडवणेच्या कल्याण निधी सांस्कृतिक भवनामध्ये पार पडला. अध्यक्षस्थानी डाँ.शेख इक्बाल मिन्ने हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून आद्य मराठीगझल संशोधक डॉ. अविनाश सांगोलेकर, गझलअभ्यासक विजय जोशी व जेष्ठ गझलकार उर्मिला बांदिवडेकर, प्रा. डाँ रेणुकादास .भ. भारस्वाडकर गझल अभ्यासक, छत्रपती संभाजीनगर हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी सिराज शिकलगार यांच्या दीवान -ए-सिराज व चार गझलसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले डॉ. मिन्ने म्हणाले की दर महिन्याला महाराष्ट्रात दिडशे काव्यसंग्रह प्रकाशित होत आहेत . मराठी गझल लिहिणारे अत्यल्प आहेत उर्दूतूनच मराठी गझल जन्माला आली आहे .रदीफ शिवाय गझल ए दीवान बनू शकत नाही. गझल लिहिणारा अगोदर चांगला माणूस असला पाहिजे. गझल लिहिताना गझलतंत्राचे , मराठीचे पक्के व्याकरण, कुठल्या शब्दाचा आघात कसा होतो याचे पुरेपूर ज्ञान असणारे व मराठीतील शब्द संपत्ती चे ज्ञान असेल तरच गझल लिहिता येते ही गझल दर्जेदार व गुणात्मक लिहू शकतो . शास्त्रोक्त व्यासंग वाढवत साधना करतो तोच चांगला गझलकार बनू शकतो. आद्य मराठी गझल संशोधक डॉ.अविनाश सांगोलेकर म्हणाले की गावाचं नाव जरी आंधळी असलं तरी डोळस गझलकार हे सिराज शिकलगार आहेत. शिकलगार हा शस्त्राला धार लावणारे असतात पण हे शिकलगार मराठी शब्दांना धार लावणारे आहेत. सिराजचा अर्थ हा प्रकाश देणारा दिवा असा आहे गझल क्षेत्रात नव्या गझलकाराना अंधाराकडून प्रकाशाकडे आणणारा आहे. असा दिवा सिराज शिकलगार आहेत. त्यांचे आजपर्यंत -- १० कवितासंग्रह, १७ गझलसंग्रह, ०१ दीवान, ०३ इतर

अशी ३१ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मराठी गझल क्षेत्रातील हा विक्रम म्हणावा लागेल.

गुणवत्तापूर्ण गझल लिहिणे जमले पाहिजे. दीवान ए गझल लिहिणे ही अत्यंत अवघड प्रक्रिया आहे . दिवान म्हणजे गझलांचा संग्रह .काफीया व रदीफयुक्त गझलांचा संग्रह होय. त्या भाषेतल्या वर्णमालेचा वापर गझलच्या शेवटचे अक्षर असते. डोंबिवली चे ज्येष्ठ साहित्यिक विजय जोशी म्हणाले प्रत्येकाने पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजेत. चांगली पुस्तके निवडून विकत घेऊन त्याचे वाचन डोळसपणे करावे. साहित्यिक म्हणून मी विचार करतोय की चांगले वाचण्यासाठी मी काही सध्या लिहितो आहे का ?असा प्रश्न साहित्यिकाला पडला पाहिजे. पुढच्या पिढीसाठी वाचले पाहिजे असे साहित्यिकांनी कसदार लिहिले पाहिजे. माणूस वाचता आला पाहिजे. समाजही डोळसपणे वाचता आला पाहिजे. नुसतेच पुस्तक वाचून चालणार नाही शब्दाचे भांडार व अनुभवाचं गाठोडं प्रत्येकाकडे असेल पाहिजे. पण ते आपल्या प्रतिभेने मांडणारे साहित्यिक निर्माण होणे गरजेचे आहे.गझलकाराचे गट व तट आहेत. पण गझलकारानी.गट तट विसरुन मराठी साहित्याची चांगली सेवा करावी. आंधळीच्या बाजीगर साहित्य सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष गझलकार सिराज शिकलगार यांनी सर्व उपस्थिताचे स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय रविंद्र सोनवणे यांनी केला यावेळी बदीउज्जमा बिराजदार सोलापूरी, सुधाकर इनामदार, बबन धुमाळ ,डॉ. लक्ष्मण हेंबाडे आदी मान्यवरासह गझलकार मोठ्या संख्येने उपस्थित होते ग्रामीण कथाकार शांतिनाथ मांगले व कविता काळे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सौ.नलिनी पवार यांनी मांडले.



**क्षेत्रातील पांचवा गझलसंग्रह गझल प्रकारातील दिवान ए गझल हा अत्यंत वेगळा आहे. मराठी अथवा अन्य भाषेतील वर्णमाला च्या अक्षरानुसार गझलेत अक्षर वापरुन गझल तयार केली जाते. गझलेतील रदीफच्या शेवटच्या अक्षराचा वर्णमाला अनुक्रम किंवा याला तरतीब असेही म्हणतात त्यास दीवान असेही म्हणतात. मराठी भाषेतील पहिला अमृताची पालखी हा पनवेलच्या ए.के.शेख यांचा दिवान ए गझल आला आहे .यात अ पासून ज्ञ पर्यंत सगळी मराठी मुळाक्षरे रद्दीफ आणि काफीयाच्या स्वरूपात घेऊन त्यावर गझलेची रचना केली आहे. यानंतर दुसरा दिवान ए गझल पिंपरी चिंचवड पुणे येथील प्रशांत पोरे , तिसरा दिवान ए गझल पिंपरी चिंचवड पुणे येथील मीना शिंदे, चौथा दिवान ए गझल बुलढाण्याच्या जगत अवचार यांचा गझल संग्रह आहेत. गझल क्षेत्रात मराठी भाषेतील पाचवा दिवान ए सिराज या गझल संग्रह आंधळीच्या शिराज शिकलगार यांचा प्रकाशित झाला आहे दिवान ए सिराज हा गझल संग्रह खूपच सुंदर असून सिराज हा गझलेचा दिवाना आहे. मराठी मुळाक्षरांच्या वर्णमाला मधील एका अक्षरावर सहा गझला आहेत या मध्ये एकूण २१६ गझला असून त्या उत्तम प्रतीच्या आहेत या दिवान ए सिराज गझल संग्रहाचा विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे. - प्रा. डाँ रेणुकादास .भ. भारस्वाडकर**

-गझल अभ्यासक, छत्रपती संभाजीनगर

# राज्यात ९५ लाखाहून अधिक बालकांना पोलिओचा डोस, आरोग्य विभागाची माहिती

**मुंबई :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवारी ३ मार्च रोजी राज्यातील ५ वर्षांपर्यंतच्या ९५ लाख ६४ हजार ६१३ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला. आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी राज्यातील जनतेला आपल्या ५ वर्षाखालील सर्व बालकांना पोलिओचा डोस देण्याबाबत आवाहन केले होते.

राज्यात एकूण ८९,२९९ बुथ व ट्रान्झिंट टिम २७,५५३ फिरती पथक १५,४३० व रात्रीचे पथक ६४२ याद्वारे ० ते ५ वर्ष वयोगटातील ९५,६४,६१३ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला आहे. यानंतर ग्रामीण भागात ३ दिवस व शहरी भागात ५ दिवस (आय.पी.पी.आय.) राबविण्यात येणार असून घरोघरी जाऊन सुटलेल्या बालकांचे लसीकरण करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय सनियंत्रण अधिकारी यांची नेमणूक करुन त्यांच्या मार्फत सर्व जिल्हा व मनपा या मोहिमेचे पर्यवेक्षण करण्यात आले.



जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली व त्यांच्यामार्फत मोहिमेचे पर्यवेक्षण करण्यात आले. सर्व शासकीय विभाग, अशासकीय संस्था, जागतिक आरोग्य संस्था, युनिसेफ, जे. एस.आय, आय.एम. आय. आय. ए.पी. स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने मोहीम १०० टक्के यशस्वी होण्यासाठी मदत झाली. देशात पोलिओ निर्मूलन कार्यक्रमाचे अंतर्गत सन १९९५ पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यांत येत आहे. दिनांक ३ मार्च २०२४ रोजी राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओची अतिरिक्त मात्रा देण्यात आली आहे. दि. २७ मार्च २०१४ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारत देश पोलिओ मुक्त असल्याचे प्रमाणित केले आहे. पोलिओग्रस्त असणाऱ्या देशांमधून स्थलांतरामुळे देशात पोलिओ रुग्ण आढळण्याच्या धोका उद्भवू शकतो. यासाठी पोलिओ निर्मुलनाकरिता पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अत्यंत प्रभावीपणे अंमलात आणणे आवश्यक आहे.

# राजकारणात ज्यांना सहकार्य केले तेच आम्हाला सहकार शिकवणार का? प्रकाश म्हस्के

**लोणी काळभोर -:** हवेलीच्या राजकारणात ज्या मंडळीना सहकार्य करून सहकार शिकवला त्या महत्वकांक्षी मंडळीमुळेच शेतकरी सभासदांना यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीला सामोरे जावे लागत याची खंत वाटते.माझ्यावर आरोप करणाऱ्यांनी आपला पूर्व इतिहास बघा मग दुसऱ्यावर आरोप करावे असा सवाल विरोधी गटाला केला.

थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान निवडणुकीसंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते,यावेळी कारखान्याचे माजी उपाध्यक्ष माधव काळभोर,माजी संचालक माधव कांचन,सुभाष काळभोर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रकाश म्हस्के म्हणाले कि निवडणूक झाली तर आपापसातले गट तट यामुळे कारखाना सुरू करण्यात अडचणी येऊ शकतात म्हणूनच आम्ही सर्वांनी बिनविरोध करण्यासाठी पुढाकार घेतला. कारखाना सुरू करायचा असेल तर गट तट भेदभाव विसरून सर्व समावेशक सर्वपक्षीय बिनविरोध संचालक मंडळ निवडून जाणे गरजेचे होते. याची जाणीव आम्हाला झाली होती कारखान्याची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी संपूर्ण तालुक्यात गेली पंधरा दिवस अनेक बैठका घेतल्या.



परंतु निवडणूक बिनविरोध झाली तर याचे श्रेय आम्हाला जाईल म्हणून तालुक्यातील दोन अति महत्वकांक्षी नेते मंडळींनी प्रत्येक मीटिंगमध्ये मुद्दामून गोंधळ घालून आमच्या प्रयत्नांना खो घातला. स्वतः चे राजकीय अस्तित्व सिद्ध करण्यासाठी यांनी संपूर्ण कारखान्याच्या सभासदांवर ही निवडणूक लादली.

तालुक्यातील सर्व जनतेने आमचे प्रयत्न पाहिलेले आहेत त्यामुळे या निवडणुकीत सभासद मंडळी यांना धडा शिकवणार असून रयत सहकार पॅनलला बहुमताने विजयी करतील असा आम्हाला विश्वास आहे,यशवंतचे सभासद जागृत असून ते योग्य उमेदवाराला मतदान करतील व सभासद्च्या विश्वासाला तडा जावू न देता यशवंत सहकारी साखर कारखाना चालू करण्यासाठी प्रयत्न करणार अशी ग्वाही यावेळी प्रकाश म्हस्के यांनी दिली.

# भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी दिला राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा



**मुंबई :** भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी हिमाचल प्रदेशातील राज्यसभेच्या जागेवरून आपला राजीनामा दिला आहे. नड्डा यांची मागील महिन्यात गुजरातमधून राज्यसभेवर वर्णी लागली असल्याने त्यांनी आता हिमाचल प्रदेशातील राज्यसभेच्या जागेवरून राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे.-राज्यसभानिवडणुकीत देशभरातून ४१ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. यामध्ये गुजरातमधूनभाजपाध्यक्षजे. पी. नड्डा यांचाही समावेश होता.

जे. पी. नड्डा हे दोन ठिकाणांहूनराज्यसभासदस्य असल्याने तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांनी एका जागेवरून आपला राजीनामा दिला असून राज्यसभेच्या अध्यक्षांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे.

अध्यक्षपदीही मिळाली आहे मुदतवाढलोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ वाढवण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला. आता जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ हा जून २०२४ पर्यंत वाढवण्यात आला आहे. त्यामुळे भाजप लोकसभेची निवडणूक आता जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखालीच लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर तत्कालीन भाजप अध्यक्ष अमित शाह यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळवले होते. त्यानंतर जे. पी. नड्डा यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती.

# वंचितने लोकसभेचे ३ उमेदवार जाहीर केले?; खुलासा करत प्रकाश आंबेडकर मविआबद्दल स्पष्टच बोलले!

**मुंबई :** लोकसभा निवडणूक तोंडावर आली असली तरी राज्यात महायुती आणिमहाविकास आघाडीतीलजागावाटपाचा तिढा कायम आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्यामहाविकास आघाडीतप्रकाश आंबेडकरयांच्या नेतृत्वाखालीलवंचित बहुजन आघाडीदेखीलसहभागी होण्यासाठी अनुकूल आहे. मात्र जागावाटपाचा पेच कायम असल्यानेप्रकाश आंबेडकरयांनी आपण अद्याप महाविकास आघाडीतील घटकपक्ष नसल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यातच महाविकास आघाडीला विश्वासात न घेता वंचित आघाडीने लोकसभेच्या तीन जागांवर उमेदवारांची घोषणा केल्याचे वृत्त समोर आले होते. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

अकोल्यातून लोकसभा निवडणूक लढवणार आहे. मात्र माझ्याव्यतिरिक्त वंचितकडून अन्य कोणत्याही उमेदवाराची अधिकृतरित्या घोषणा करण्यात आलेली नाही, असा खुलासा प्रकाश आंबेडकर यांनी आजच्या पत्रकार परिषदेत केला आहे. वंचित आघाडीने अकोल्यासह वर्धा आणि सांगलीसाठी आपला उमेदवार निश्चित केल्याचं बोललं जात होतं. मात्र प्रकाश आंबेडकर यांनी या चर्चा फेटाळून लावल्या आहेत.वंचित बहुजन आघाडीच्यावर्धा जिल्हा कमिटीची बैठक झाली. या बैठकीत त्यांनी मला पत्र लिहीत एका उमेदवाराचं नाव सुचवलं आणि या जागेसाठी आपण महाविकास आघाडीत आग्रह धरावा, अशी विनंती जिल्हा कमिटीने केली आहे. मात्र जिल्हा कमिटीला उमेदवार ठरवण्याचे किंवा जाहीर करण्याचे अधिकार नाहीत. त्यांनी फक्त नाव सुचवलं आहे, अशी माहिती प्रकाश आंबेडकरांनी दिली आहे.

तसंच सांगलीबाबत आम्ही आमची भूमिका ८ मार्च रोजी जाहीर करू, असंही आंबेडकर यांनी म्हटलं आहे.दरम्यान, महाविकास आघाडी व्हावी, यासाठी आम्ही शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करू. मात्र महाविकास आघाडी न झाल्यास राज्यात भाजप विरुद्ध वंचित बहुजन आघाडी असा सामना होईल, असंही प्रकाश आंबेडकर म्हणाले. आघाडीच्या कार्यक्रमांना न जाण्याचे कार्यकर्त्यांना आदेशप्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडियावरून आपल्या कार्यकर्त्यांना आवाहन करत महाविकास आघाडीच्या कार्यक्रमांना न जाण्याचं आवाहन केलं आहे. वंचित बहुजन आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांना आवाहन आहे की, वंचित बहुजन आघाडीची महाविकास आघाडीसोबत अजूनपर्यंत युती पूर्ण झालेली नाही. तेव्हा इतर पक्षांकडून पक्ष बैठक किंवा कार्यक्रमाला बोलावत असतील तर त्या बैठकी, कार्यक्रमामध्ये उपस्थित राहू नये. मी किंवा पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांची सूचना येईपर्यंत कोणीही सहभागी होऊ नये, अशा सूचना आंबेडकर यांच्याकडून देण्यात आल्या आहेत.

# पाचशेवर अर्ज आल्यास बॅलेटवर निवडणुका? मराठा समाजाचा पाचशे उमेदवार देण्याचा निर्णय



**अहमदनगर :** विरोधी पक्षांकडून आधीच बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी होत असताना आता राज्यात सकल मराठा समाज लोकसभा मतदारसंघात प्रत्येक गावातून दोन उमेदवार देणार आहे. प्रत्येक मतदारसंघात किमान ५०० उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, 'ईव्हीएम'वर मर्यादा आहेत. अशा स्थितीत निवडणूक आयोग बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्या लागतील, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे, तर वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही होईल, असे निवडणूक अधिकारी सांगत आहेत.

तज्ज्ञांच्या मते या समस्या असतील

- मोठ्या प्रमाणात ईव्हीएम उपलब्ध करणे कठीण
- बुथनिहाय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, वाढत्या कर्मचारी संख्याबळाची समस्या
- एवढी मोठी मतदार यादी 'ईव्हीएम'वर असेल तर मतदार संभ्रमित होऊ शकतो.
- राजकीय पक्षांच्या प्रभावावर परिणाम होऊ शकतो.

**ईव्हीएम मशीनवर ३८४ उमेदवारांसाठी मतदान करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यापेक्षा जास्त उमेदवार असतील तर ईव्हीएमला मर्यादा आहेत. लोकसभा निवडणुकीत पाचशे उमेदवार असतील तर त्याबाबत वरिष्ठांकडून जे निर्देश येतील त्यानुसार कार्यवाही होईल.**

**- राहुल पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, अहमदनगर**